# मुंबई विद्यापीठ

मानव संसाधन विकास कक्ष
कक्ष क्र. २११, एम.जी.रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in
ई-मेल : dr.estab@fort.mu.ac.in

दुरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४


क्र.मासंविक/आवसीडी/२०२४-२५/ ८६८ दि.२० जानेवारी, २०२५

## परिपत्रक

**विषय : राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तिवेतन योजना (UPS) यापैकी कोणत्याही एका योजनेत सहभागी होण्याकरीता विकल्प सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :** वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे-प्र.क्र.५४/सेवा-४, दि. २०/०९/२०२४.

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, समन्वयक/संचालक, ठाणे उपकेंद्र, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन अनुदानीत पदावर नियुक्त झालेल्या सर्व स्थायी शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की,

१) ज्यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (NPS) लागू आहे अशा कर्मचाऱ्यांना उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना दिनांक ०१.०३.२०२४ पासून लागू करण्यात आली आहे.

२) त्याचबरोबर केंद्र सरकारने दि.२४.०८.२०२४ रोजी घोषित केलेली 'एकीकृत निवृत्तिवेतन योजना' (Unified Pension Scheme) शासकीय कर्मचाऱ्यांना जशीच्या तशी लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचारी यांना वरील दोन्ही योजनेमधील कोणत्याही एका योजनेत सहभागी होण्यास मुभा आहे.

राज्य शासनाच्या सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेसाठी पात्र व इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठीचा द्यावयाचा एक वेळचा (One Time Option) विकल्प दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत संबंधीत कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

मात्र सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा वरीलप्रमाणे विकल्प दिलेल्या कर्मचाऱ्यास सदर विकल्पाचा फेरविचार करुन ज्यांना केंद्र शासनाच्या एकीकृत निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी व्हावयाचे असेल तर त्यासंदर्भातील विकल्प दिनांक ३१.०३.२०२७ पर्यंत किंवा केंद्र शासनाच्या 'एकीकृत निवृत्तिवेतन योजना' (Unified Pension Scheme) संदर्भात निर्गमित होणाऱ्या तपशीलवार मार्गदर्शक सूचनेमध्ये विकल्पाची निवड करण्याचा नमूद दिनांक यापैकी जो अगोदरचा दिनांक असेल तोपर्यंत फक्त एकदाच देण्याची मुभा राहील. तदनंतर सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेंतर्गत दिलेला विकल्प कोणत्याही कारणास्तव बदलता येणार नाही.

वरील दोन्ही योजनेमध्ये जे कर्मचारी सहभागी होणार नाहीत त्यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत निवृत्तिवेतन योजना आपोआप लागू राहील.

विद्यापीठातील सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त १ व २ येथे नमुद निवृत्तिवेतन योजनेच्या अधिक माहितीकरीता संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करुन वरीलप्रमाणे कोणत्याही एका निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होण्यासाठीचा विकल्प **(नमुना सोबत जोडला आहे) दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत उपकुलसचिव, मानव संसाधन विकास कक्ष यांचेकडे सादर करावा.** जे कर्मचारी विहित वेळेत विकल्प सादर करणार नाहीत त्यांना उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे भविष्यात लाभ अनुज्ञेय करण्याबाबत अडचणी निर्माण झाल्यास त्यास ते सर्वस्वी जबाबदारी राहतील याची नोंद घ्यावी.

**कुलसचिव**
**मुंबई विद्यापीठ**

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी, कल्याण व ठाणे उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

२) स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र-कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) सचिव, उमासा.
२) सचिव, मुंबई विद्यापीठ ऑफिसर्स वेल्फेअर असोशिएशन
३) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ
४) सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना
५) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना
६) सचिव, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन शाखा मुंबई विद्यापीठ.

# विकल्प

**वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेनिवे-प्र.क्र.५४/सेवा-४, दि. २०/०९/२०२४.**

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्यांना कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तिवेतन योजना (UPS) लागू करण्याबाबत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार दि. ०१/०३/२०२४ पासून

१. मी खालील सही करणार / करणारी ---------------------------------------------------- याद्वारे आपणास कळवू इच्छितो / इच्छिते की, दिनांक ------------------ पासून मला राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करावी.

**किंवा**

२. मी खालील सही करणार / करणारी ---------------------------------------------------- याद्वारे आपणास कळवू इच्छितो / इच्छिते की, दिनांक -------------------- पासून मला केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तिवेतन योजना (Unified pension Scheme) लागू करावी.

**किंवा**

३. मी खालील सही करणार / करणारी ---------------------------------------------------- याद्वारे आपणास कळवू इच्छितो / इच्छिते की, दिनांक --------------------- पासून मला सद्यस्थितीतील राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली योजनाच (NPS) लागू करावी

**दिनांक -**

**कर्मचाऱ्याची सही/अंगठा**

**विकल्प स्विकारला -**